**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०६**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०७/११/२०१९ वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०७/११/२०१९ रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडगे | - | सदस्य |
| ३) मा. बनसोडे राजू वि श्वनाथ | - | सदस्य |
| ४) मा.आशा धायगुडे – शेंडगे | - | सदस्या |
| ५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ७) मा.सोनवणे शारदा हिरेन | - | सदस्या |
| ८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | - | सदस्य |
| ९) मा.काटे अनिकेत रविंद्र | - | स्विकृत सदस्य |
| १०) मा.कणसे संजय गुलाब | - | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.सीताराम बहुरे - क्षेत्रीय अधिकारी (ड क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.संजय खाबडे – कार्यकारी अभि यंता विद्युत, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्रीम.मोमीन झेड.आय.- उपअभियंता, श्री.मोहन खोंद्रे – उपअभियंता-झो.नि.पू., श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था.), श्री.शशिकांत दवंडे – उपअभियंता- पाणीपुरवठा, श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता विद्युत, डॉ.यशवंत इंगळे – वाय.सी.एम.रुग्णालय, डॉ.आनंद करणे - वाय.सी.एम.रुग्णालय , श्रीम.एस.एस.कुलकर्णी , क.अभियंता, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य, श्री.भंडारी एम.पी.-क.अभियंता स्थापत्य, श्रीम.सी.ए.मोरे – प्र.उपअभियंता(स्था.उ.), श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अ.जलनि:सारण, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, श्रीम.प्रीती यादव – क.अभियंता- जलनि:सारण, श्री.कोतकर पी.बी. क.अ.झोनिपू स्थापत्य, श्री.बाळासाहेब शेटे – क.अभियंता श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.सानप एस.एस.-क.अभियंता, श्री.जिंतीकर आर.एन.- क.अभियंता जलनि:सारण, श्री.एस.ए.बगली- क.अभियंता, श्री.डी.एस.सासवडकर- सहा.आरोग्याधिकारी, श्री. एस.बी.लांडगे – उद्यान सहाय्यक, श्री.जे.व्ही.पटेल-सहा.उद्यान अधिक्षक, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.संजय बबनराव मानमोडे – आरोग्य निरीक्षक, श्रीम.रश्मी तुंडलवार – आ.नि., उध्दव डवरी –आ.नि. कचरावाहतुक, श्रीमती जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक

----------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे नोव्हेंबर २०१९ च्या दिनांक ०७/११/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.०५ माहे सप्टेंबर २०१९ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे सप्टेंबर २०१९ कार्यपत्रिका क्र. ०५ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** - सभाशाखा :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १-** प्रभाग क्र. ३० येथे विद्युत दाहिनी उपलब्ध करुन मिळणेबाबत...मा. राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०७/११/२०१० चे पत्र.

**विषय क्र.२-** प्रभाग क्र. ३० दापोडी सिध्दार्थनगर येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत...मा. राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०७/११/२०१० चे पत्र.

**विषय क्र.३-** जुनी सांगवी २७ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मनपा शाळामधील हॉलबाबत. मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे यांचे दि नांक ७/११/२०१९ चे पत्र.

---------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव - सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या प्रभाग कामकाजाबाबत चर्चा करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : सन्मा. सदस्य यांनी प्रभाग कामकाजाबाबत काही सुचना असतील त्या करणेस मान्यता देणेत येत आहे. तदनंतर माहे नोव्हेंबर २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

--------

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे. -** या निवडणुकीमध्ये चिंचवड मतदारसंघातून मा.लक्ष्मणराव जगताप, पिंपरीमधून मा.अण्णा बनसोडे व भोसरी विधानसभा मतदार संघातून मा.महेशदादा लांडगे निवडून आल्याबद्दल सर्व प्रभागाचे वतीने व नगरसेवकांच्या वतीने ठराव मांडला व मा.माई काटे यांनी अनुमोदन दिले.

**मा.आशा शेंडगे –** आता दिवाळी संपली आहे. आमदार निवडून आले. सव्वादोन वर्षासाठी कामकाज करणेबाबत आमचे सगळे प्रयत्न आम्ही करणार परंतु तुमच्या मदतीशिवाय कामकाज होत नाही. कामाच्या ठिकाणी आमची बांधिलीकी असते. पक्षाकडून आमची नगरसेवक म्हणून आमची कामगीरी दिसली पाहिजे. सर्व अधिका-यांनी नवीन इच्छाशक्ती निर्माण करुन कामे करावीत. सर्व अधिका-यांना आमचा पाठिंबा असेल. तिन्ही आमदारांच्या मदतीने कामकाज करणार आहे. तुमच्या सगळयांच्या सहकार्याने आम्ही कामे करु शकतो. दिवाळी चांगली गेल्यामुळे फ्रेश मुडने कामे करावे लागेल अशी अपेक्षा करतो. आम्ही बोलतो व त्याप्रमाणे अधिका-यांवर कारवाई होते. आजच्या मिटींगला जे अधिकारी उपस्थित नाहीत त्यांना सगळयांना नोटीस काढणे. त्यांनी अधिका-यांना, अध्यक्षांना कळविणे गरजेचे होते. अतिक्रमणचे अधिकारी भेटत नाही त्यांना नोटीस काढणे. कोणतेही अधिकारी असोत त्यांना नोटीस काढणे.

**मा.सभापती –** सगळया अधि का-यांना लेटर तयार करणे व त्यांचेवर ऍक्शन घेणे. सगळया अधिका-यांना मिटींगला बोलविणेबाबत सांगितले होते.

**मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत -** शिवाजी पुतळासमोर किती घाण झाली आहे. कचराकुंडया शेजारी लोक राहतात त्यांना हटवत का नाही. नेहमी त्या विषयावर बोलत असते.

**मा.आशा शेंडगे -** दोनदा झोपडया काढल्या परंतू परत परत झोपडया तयार करतात. लाखो रुपये खर्च केले जाते व पुन्हा पुन्हा ही लोक झोपडी टाकतात. राऊत मॅडमनी झोपडया काढल्या होत्या परंतू दोन तासात झोपडया होतात. फक्त वॉर्ड खराब करीत नाहीत तर संपूर्ण शहर तसे झाले आहे. ख-या अर्थाने शहराची काय अवस्था झाली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे नदीच्या ठिकाणी लावा. माझे वैयक्तीक काम नाही. लक्ष ठेवायचे काम आमचे नाही. सगळी नदी बुजायला लागली. काही दिवसात ते गटर होईल. किमान प्रभागापुरते तरी काम करा.

**मा.खाबडे –कार्यकारी अभियंता विद्युत -** सीसीटीव्ही कॅमेरे बसविता येत नाही तसा जी.आर.आहे. नियमाप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरेचे काम होणार नाही.

**मा.सभापती -** सीसीटीव्ही कॅमेरेचे काम का होणार नाही याची माहीती सर्वांना सांगा. आमच्या ज्या मागण्या आहेत त्या आम्हाला पुर्ण करुन दयायच्या आहेत. तुम्ही आम्हाला जी.आर. वाचून दाखवा आम्ही त्याचे उत्तर देतो.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे. –** जी.आर.दाखवा. जी.आर.कोणी तयार केला. जी.आर.ची धमकी देतात.

**मा.आशा शेंडगे –** तुम्ही टेंडर काढू शकता. तुम्ही स्वता: का नाही म्हणत. एलइडी का नाही घ्यायचे. आपले सभागृहात काय निर्णय घेतला. विद्युतची वेगळी मिटींग घ्यावी. मानधनामधून आम्ही एलइडीचा खर्च करु. स्लम एरियात दिवाळी अंधारात गेली. वैयक्तिक वर्षभराचे मानधन करुन एलइडी दिवे बसवू.

**मा.सभापती -** एलइडी बसविणेबाबत सर्व नगरसेवकांची मागणी आहे. परिपत्रक नगरसेवकांना दाखवा. आमची मागणी आहे. आम्ही दोन दिवसात मिटींग लावू. आम्हाला एलइडी पाहिजे. नागरीक सांगतात तसेच आम्ही म्हणत असतो. सर्व नगरसेवकांची अडीच वर्षे गेली आहेत. आतापर्यंत दोन इलेक्शन झाले आहेत. नगरसेवकांना अडीच वर्षात नागरीकांना कामे दाखवावी लागेल. लोकांची सेवा केली तर लोक आम्हाला

विचारणार आहे. मिटींग झालेवर आपण ठरवू.  अभ्यासू नगरसेवक आहेत. आम्ही त्यात बदल करु शकतो. सोमवारी मिटींग घेऊन या विषयावर निर्णय घेऊ.

**मा.आशा शेंडगे** – नगरसेवकांना पेपर दया आम्ही  त्याचे वाचन करतो. सोमवारी पेपर आल्यावर गुरुवारी मिटींग घेऊ.

**मा.माई काटे** – कच-याच्या गाडया किती आहेत. दोन छोटया गाडया व ३ मोठया अशा     कच-याच्या गाडया मिळाल्या पाहिजे. नेहमी कच-याच्या दोन गाडया लागतात.

**मा.राजू बनसोडे** -  कुठल्या गाडया चालू आहेत. दापोडीमध्ये, फुगेवाडीमध्ये ज्या गाडया आहेत त्या कचराउचलत नाही म्हणून नागरीकांचे फोन येतात. कचरा ओव्हरफ्लो होतो. रस्त्यावर कचरा पडलेला असतो. कच-याच्या गाडया येत नाही. महापालिकेचे कर्मचारी उलटे बोलतात.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** -  वॉर्ड क्र. ३२ मध्ये सांगवी येथे ठेका कोणाला दिला आहे. त्यांना किती लोक भरायची परमिशन दिलेली आहे. ठेका देत असताना स्वच्छता करणेकरीता किती झाडूवाली लागतात. प्रत्यक्ष जागेवर २० लोक सुध्दा दिसत नाही.

**मा.सासवडकर – सहा.आरोग्याधिकारी** – तीन गाडया मिळणार आहे. वॉर्ड क्र. ३२ मध्ये ४५ लोकांची मान्यता आहे. पानमलकर यांना ठेका दिलेला आहे.  १०,१५ दिवस कर्मचारी दिवाळी सणामुळे रजेवर होते.  या ठिकाणी मानमोडे सो. आहेत.  कर्मचा-यांचे थम्ब रिपोर्ट असतात.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** – वॉर्डमध्ये ४५ लोक दिलेले आहे. स्पेअर पाच महिला पाहिजे. रस्त्यावर ही लोक काम करीत नाहीत. त्यांना फोन करावा लागतो. काही दलदलीचा भाग आहे. पूर आल्यापासून कोणी काम करीत नाही. जोपर्यंत ड्रेनेजचे काम होत नाही तोपर्यंत ते काम पुर्ण करावे. आमचे घरातील लोक सुध्दा आजारी होतात. झाडू खात्यामध्ये आरोग्याचा भाग चालू झाल्यापासून लोक काम करीत नाही. पुरामध्ये काही लोकांनी काम चांगले केले आहे. ठेकेदार पध्दत बंद करा.  आम्हाला महापालिकेचे कर्मचारी पाहिजे.

**मा.शारदा सोनवणे** – माझे वॉर्डमधील आरोग्य विभागाच्या महिला भाज्या निवडत बसतात. त्यांना कोणाचे नियंत्रण नाही. वॉर्डमध्ये औषध फवारणी होत नाही.  झुरळ, उंदीर, घुशीसाठी काही केमिकल आहे का. घुशीमुळे घरे खराब होतात. टेंडर निघाले तर बरे होईल. माझे वॉर्डमध्ये दोन दोन दिवस कचरा उचलला जात नाही. कचरा संकलन आहे रोजचे रोज कचरा उचलला पाहिजे.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** - रस्त्यावरील कचरा बाहेर पडतो. गेट किती दिवसात बसवून मिळेल. अडीच वर्षे झाले आहे. आम्हाला उपोषण करावे लागेल. झोपडपट्टीत राहणारे लोकांना टॅक्स नाही. तेथील लोक खूप घाण करतात. गेट लवकरात लवकर बसवून दयावे. ममतानगर येथील लोकांनी नदीचा अर्धा भाग भरलाय. झाडे कुठे गेली आहे?

**मा.भोसले** – दहा बारा दिवसात गेट तयार करुन मिळेल.

**मा.शारदा सोनवणे** – नारळाची झाडे तोडायला सांगितले आहे.  ती झाडे कुजलेली आहेत. सहा महिन्यापासून सांगत आहे परंतू हे लोक फोन बंद करतात. दोन दिवसात काम झाले पाहिजे. प्रायव्हेट कामे करतात.

**श्री.लांडगे** – ती झाडे खूप वाढलेली आहे तोडता येणार नाही.

**मा.सभापती** – नगरसेवकांचे फोन घेत जा. त्यांनी भेटत जा. उद्यान विभागाने कार्यवाही करावी.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** –  ममतानगर येथील अतिक्रमणचे काम जोरात चालेले आहे. ठेकेदाराची चूक होती. जंगल गायब केले. ती झाडे कुठे गेली?

**मा. कणसे संजय गुलाब – नामनिर्देशीत सदस्य** – अधिकारी व नगरसेवक एकत्र भेटू. वेळापत्रक तयार करणे. अधिका-यांसोबत वॉर्डमध्ये पाहणी दौर करा.

**मा.सभापती** – सर्व वॉर्डमध्ये पाहणी दौरा करण्यासाठी वेळापत्रक तयार करण्यात येईल व त्यापध्दतीने सर्व वॉर्डमध्ये पाहणी करण्यात येईल.

**मा. कणसे संजय गुलाब – नामनिर्देशीत सदस्य** – रस्त्याच्या कडेला झाडे वाढली आहेत ती झाडे काढली जात नाही.  वाढलेले गवत कापले /काढले पाहिजे. औषध फवारणी व धुर फवारणी सुध्दा करीत नाही. टेंडर घेतले परंतू कामे वेळेवर होत नाही.  अध्यक्षांसोबत वॉर्ड पाहणी दौरा  झालाच पाहिजे.

**मा.आशा शेंडगे** – या शहरामध्ये काय कामे करतात. ओला कचरा वेगळा करीत नाही. कचरा वेगळा करीत नसेल तर तो कचरा उचलण्यात येऊ नये.  ब-याच ठिकाणी दोन्ही कचरा एकत्र टाकला जातो. कर्मचा-यांकडून अजिबात कचरा उचलण्याचे काम होत नाही. कच-याचे ढीग पडलेले असतात. खराटा मारलेला कुठेही दिसत नाही. टीमकडून स्वच्छता होत नाही. संडास ब्लॉकच्या ठिकाणी स्वच्छता होत नाही. झाडे कापायला सांगितली होती. सर्वांसमोर बोलले होते १०० टक्के कामे केली जातील.  बाहेरची तरी झाडे तोडायची. वैयक्तीक कामे नाही तरी का करीत नाही. ठेकेदाराला काय बोलायचे.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** – झाडे तोडण्याचा  ठेका किती दिवसासाठी दिला आहे. ठेकेदाराची मुदत किती दिवसाची आहे ती माहिती काढावी. शेखला पालिकेने  विकत घेतले आहे का? पाणीपुरवठयाचा तर फारच गोंधळ आहे. दोनशे अडीचशे एमएल पाणी दिलेले आहे तरी पाण्याची तक्रार आहे. पाण्याचे नियोजन काय आहे. दिवाळी पासून

पाण्याची तक्रार करीत आहे. दोन वेळा पाणीपुरवठा केला तर सुरळीत होईल. पाणी रेग्युलर चालू करायचे आहे. पाणीसंदर्भात मा.आयुक्तांशी बोलणे झाले आहे. वॉल सोडला म्हणजे पाणी दिले असे होत नाही. प्रत्येक गल्ली, वस्तीमध्ये पाणी मिळते का हे पाहणे. मधले भागात पाणी येत नाही. महापालिकेच्या पाण्याच्या टाक्यांचा ठेका कोणाकडे आहे?

**श्रीम.सुरेखा कुलकर्णी – प्र.उपअभियंता पाणीपुरवठा** - महापालिकेच्या पाण्याच्या टाक्यांचा ठेका श्री. वाघेरे यांचेकडे आहे.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** – पाणीपुरवठा विभागाचे किती लोक आहेत. आज किती लोक आहेत ते सांगा. आजची कर्मचायांची हजेरी सांगा. नागरीकांना दिवाळीमध्ये सुध्दा पाणी मिळाले नाही. वॉलमन काय काम करतात. पाणी ही अत्यावश्यक सेवा आहे. वाघेरेंनी आजची कर्मचा-यांची हजेरी घेऊन येणे.

**श्रीमती सुरेखा कुलकर्णी – प्र.उपअभियंता पाणीपुरवठा** – पाणीपुरवठा करणारे कर्मचारी तीन शिफ्टमध्ये काम करतात. वायाळ सुट्टीवर आहे.

**मा.राजू बनसोडे** – काम करणारे लोक भरपूर आहे. पाण्याच्या २२ टाक्या आहेत तरी पाण्याची अडचण आहे. दापोडीसाठी काही तरी मार्ग काढा. मानधनवर काम करणारे लोक पाण्याचे कनेक्शनचे काम करतात. बांधकाम व्यवसाय करणा-यांना नळकनेक्शनदेऊ नका. त्यांना पाणी देऊ नका असे भाऊंचे स्टेटमेंट आहे. सरकारी दवाखान्यामध्ये वेळेवर ट्रीटमेंट मिळत नाही. आमचे ऑफिसला लोक तक्रारी घेऊन येतात.

**मा.आशा शेंडगे** – दापोडीकरांना पाणी मिळत नाही. दिवसाआड पाणी दयावे. तीन दिवस एका टप्प्याला व एक दिवस दुस-या ठिकाणी दसावे. ठेक्याच्या माणसांची दयनीय अवस्था आहे. ते खरच डयुटीवर येतात का पाहिले पाहिजे. पालिकेचे कर्मचारी सुध्दा पुर्णवेळ थांबत नाही.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** – शहरामध्ये बोअरवेल घेतलेल्या आहेत. परंतू त्या चालू करायच्या आहेत. धुणी, भांडी करण्याकरीता चालू केली होती. प्रत्येक वॉर्डमध्ये चालू केली आहेत. बोअरवेलचा वापर कसा होईल हे पाहणे.

**मा.राजू बनसोडे** – दापोडी प्र.क्र.३० मधील सीएमई गेट समोरील सब-वे ला श्री.संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज असे नाव देण्याबाबतच्या ठरावाला मा.आयुक्तांचा विरोध असेल तर तसे सांगावे.

**मा.सभापती** – प्रभागातील ठराव आहे. प्रभागाची मान्यता आहे. या विषयाला पुढच्या मिटींगला खुलासा पाहिजे. स्थानिक नगरसेवकांकडून सुचविले जाते. नगरसेवकांनी ठराव मांडलेला आहे. याबाबत त्वरीत खुलासा देणे.

**मा.शाम गणपतराव लांडगे** – प्रभागातील सभागृहाचा ठराव आहे. मा.आयुक्त साहेबांचा या विषयाशी संबंध नाही. हा ठराव सदस्याचा आहे. नगरसेवक राजू बनसोडे यांनी हा विषय मांडलेला आहे. स्विकृत नगरसेवक यांना प्रभाग समितीच्या मिटींगला बसता येते. त्याप्रमाणे जी.बी.ला बसण्याची परमिशन आहे याबाबत माहिती घेण्यात यावी.

**मा.आशा शेंडगे** – प्रभाग समितीमध्ये स्विकृत नगरसेवक बसले आहेत. परंतू जी.बी.ला स्विकृत नगरसेवक यांना बसता येत नाही. या संदर्भात माहिती घेण्यात यावी.

**मा.सोनवणे शारदा** – नदयांमध्ये जलपर्णी खूप वाढली आहे ती काढणेचे काम करणे.

**मा उषा उर्फ माई मनोहर ढोरे.** – उद्यान विभागाने सांगवी उद्यान विभागाला ठेका दिलेला आहे त्या ठेकेदाराची मुदत संपली आहे का? एवढी कामावर घेतलेली लोक आहेत का? चारही नगरसेवकांना दोन दिवसात माहिती दयावी. पशुवैद्यकि य अधिकारी यांचेवर कार्यवाही केली पाहिजे. जे अधिकारी मिटींगला उपस्थित नाही त्यांचेवर कार्यवाही करावी. अतिक्रमणचे अधिकारी यांचेवर कार्यवाही करणे.

**मा.सभापती** – सर्व वॉर्डमधील ड्रेनेजचे काम करावे. पाणीपुरवठा वेळेवर व योग्य प्रमाणात करावा. पाणीपुरवठयाबाबत मिटींगमध्ये सर्वांनी नाराजी व्यक्त केली आहे. सोमवार दिनांक ११/११/२०१९ ते शुक्रवार दिनांक १५/११/२०१९ पर्यंत सर्व वॉर्डमध्ये कार्यकारी अभियंता, उपअभियंता तसेच सर्व संबंधीत अधिकारी हे सन्मा.नगरसेवकांसोबत वॉडमध्ये पाहणी दौरा करण्यासाठी असतील. सर्व वॉर्डमध्ये पाहणी केल्यावरच सर्व गोष्टी समजतील.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

| | |
|---|---|
| ठराव क. ८ | विषय क्र.- १ |
| दिनांक –०७/११/२०१९ | विभाग - |
| सुचक – मा.राजू बनसोडे | अनुमोदक - मा. स्वाती काटे |

**सदंर्भ** – प्रभाग क. ३० येथे विद्युत दाहिनी उपलब्ध करुन मिळणेबाबत मा. राजू विश्वनाथ बनसोडे यांचेकडील दिनांक ०७/११/२०१९ चा प्रस्ताव. प्रभाग क. ३० दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी येथे वाढती लोकसंख्या पहता प्रभाग क्र.३० येथे विद्युतदाहिनी नाही प्रभागातील नागरीकांना अंत्यविधीसाठी

बोपोडी, पिंपरी या ठिकाणी जावे लागते तरी नागरीकांची गैरसोय ठाळण्यसाठी प्रभागामध्ये विद्युतदाहिनी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ९ — विषय क्र.- २

दिनांक –०७/११/२०१९ — विभाग -

सुचक – मा.राजू बनसोडे — अनुमोदक - मा. स्वाती काटे

**सदंर्भ –** प्रभाग क्र. ३० दापोडी सिध्दार्थनगर येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत मा. राजू विश्वनाथ बनसोडे यांचेकडील दिनांक ०७/११/२०१९ चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३० दापोडी, सिध्दार्थनगर येथे मशीदीजवळ अवैध प्रकार चालतात रात्रीच्या वेळी अनेक प्रकारचे गैरप्रकार मशीदीच्या आवारात होत असतात यामुळे जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी सिध्दार्थनगर येथील मशीद व दापोडीतील काही संवेदनशील भागात त्वरीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १० — विषय क्र.- ३

दिनांक –०७/११/२०१९ — विभाग -

सुचक – मा.उषा ढोरे — अनुमोदक - मा. सीमा चौगुले

**सदंर्भ –** जुनी सांगवी २७ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म.न.पा.शाळामधील हॉलबाबत. मा.उषा उर्फ माई ढोरे यांचेकडील दिनांक ०७/११/२०१९ चा प्रस्ताव.

जुनी सांगवी २७ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म.न.पा.शाळामधील शाळेच्या हॉलमध्ये संत निरंकारी बाबा यांच्या मार्फत ज्येष्ठ महिला पुरुष यांचेकरीता सत्संग, योग, ध्यान, प्राणायाम याकरीता दर सोमवारी सायं.६.३० ते रात्री ८.०० वा.पर्यंत तसेच पतंजली योग महिलांकरीता सकाळी ५.०० ते.६.०० वा. व निर्मलादेवी ज्येष्ठ महिला संघाकरीता सायं.६.३० ते ७.०० या वेळात विनाशुल्क वापराकरीता देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती –** मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

जा.क्र.हक्षेका/कावि/११०/२०१९
दिनांक – २२/११/२०१८

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी – ३४.

प्रत – सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.